MHST080005152025

**नियमीत फौजदारी खटला क्र.७४/२०२५**
**(शिरवळ पोलीस स्टेशन गु.र.नं.३९/२०२५)**

महाराष्ट्र सरकार तर्फे शिरवळ पोलीस स्टेशन

–वि.–

तेजस महेंद्र निगडे

## निशाणी क्र.०६ वरील आदेश

अर्जदार महेंद्र तात्याबा निगडे यांनी नियमीत फौजदारी खटला क्र.७४/२०२५, (शिरवळ पोलीस स्टेशन गु.र.नं.३९/२०२५) मधील जप्त मुद्देमाल परत मिळणेकरीता प्रस्तुत अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये दाखल केलेला आहे.

**अर्जातील थोडक्यात कथन पुढील प्रमाणे** –

**०२.** शिरवळ पोलीस स्टेशन गु.र.नं.३९/२०२५ हा भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अन्वये दाखल केलेला आहे. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेली स्प्लेंडर मोटरसायकल हे दुचाकी वाहन क्र.एम.एच.१२ डब्ल्यू.वाय.२२९६, चेसीस नं.MBLHAW226RHD48968 ही परत मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, वर नमुद वाहन हे त्यांच्या मालकीचे आहे. सदर वाहन पोलीसांनी सदर गुन्हयात जप्त करुन पोलीस स्टेशनचे आवारात ठेवलेले आहे. सदर गुन्ह्याचा निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. अशा परिस्थितीत सदर वाहन उघडयावर पडून राहिल्यास त्याचे नुकसान होईल. सबब, अर्जदाराने सदर जप्त वाहन परत मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे.

**०४.** विद्वान सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे मागविण्यात आले. विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी सदर अर्जावर त्यांचा जबाब दाखल केला असून त्यांनी देखील सदर वाहन मूळ मालकास परत करण्याबाबत हरकत दर्शविलेली आहे.

**०५.** अर्जदार यांनी त्यांचे अर्जाचे पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.७ लगत दाखल केले आहे. त्याचप्रमाणे अधिक पुराव्याकामी अर्जदाराच्या आधारकार्डची स्वसाक्षांकित प्रत, रेशनकार्डची स्वसाक्षांकित प्रत, वाहनाच्या नोंदणीकृत प्रमाणपत्राची प्रत, मोटरसायकल खरेदीच्या बिलाची प्रत, वाहन विम्याची प्रत इत्यादी दस्तऐवज दाखल केले आहेत. अभिलेखावर दाखल जप्त वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आरोपी तेजस महेंद्र निगडे हा सदर वाहनाचा नोंदणीकृत मालक आहे. निशाणी क्र.९ लगत अर्जदार महेंद्र तात्याबा निगडे यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केले असून सदर प्रतिज्ञापत्रामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, ते आरोपी तेजस महेंद्र निगडे याचे वडील आहेत व सदर जप्त वाहन हे त्यांच्या कौटुंबिक व शेतीच्या दैनंदिन गरजांसाठी आवश्यक आहे. तसेच, आरोपी तेजस महेंद्र निगडे याने निशाणी क्र.११ लगत सदर जप्त वाहन त्याचे वडील महेंद्र तात्याबा निगडे यांच्या ताब्यात देण्याबाबत आदेश होणेकामी अर्ज केला असून सदर अर्जात त्याने त्याच्या वडिलांकडे जप्त वाहनाचा ताबा देण्यास संमती दर्शवली आहे.

**०६.** आजपावेतो अर्जदाराव्यतिरिक्त सदर जप्त वाहनाचा ताबा कोणीही मागितलेला नाही. त्यामुळे अर्जदार जप्त वाहनाचा ताबा मिळण्यास पात्र आहेत. प्रस्तुत गुन्हयाचा खटला पूर्ण होणेस बराच अवधी लागणार आहे. तोपर्यंत सदर वाहन पोलीस स्टेशनचे आवारात उभे ठेवल्यास त्याचे नुकसान होण्याची तसेच त्यांचे किंमतीत घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत, अर्जदारास जप्त वाहन अटी व शर्तीवर परत देणे योग्य होईल. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. शिरवळ पोलीस स्टेशन गु.र.नं.३९/२०२५ हा भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), मध्ये जप्त केलेले स्प्लेंडर मोटरसायकल हे दुचाकी वाहन क्र.एम.एच.१२ डब्ल्यू.वाय.२२९६, चेसीस नं.MBLHAW226RHD48968 हे वाहन अर्जदार महेंद्र तात्याबा निगडे यांच्या ताब्यात कागदपत्रांची शहानिशा केल्यानंतर त्यांना रक्कम रुपये ६०,०००/- चे बंधपत्र (बॉन्ड) घेऊन खालील अटींवर परत करण्यात यावे.

अ. अर्जदार यांनी वरील नमुद वाहन यात कोणत्याही प्रकारचा बदल करु नये.

ब. अर्जदार यांनी सदर वाहनासंदर्भात त्रयस्त इसमाचे हक्क, हितसंबंध निर्माण करु नये अथवा सदर वाहन कोणालाही विक्री करु नये आणि कोणाकडे गहाण ठेवू नये.

क. अर्जदार यांनी सदर वाहनाचा वापर कोणत्याही प्रकारच्या गुन्ह्यामध्ये करु नये.

ड. न्यायालय आदेश करेल त्यावेळेस अर्जदार यांनी सदर वाहन न्यायालयात हजर करावे.

इ. तपासी अमंलदार यांनी सदर वाहन अर्जदारास परत करतांना त्याचा सविस्तर पंचनामा करुन मुददेमालाचा एक रंगीत फोटो काढून न्यायालयाच्या अवलोकनासाठी दाखल करावा.

३. सदरचा अर्ज, त्यावरील आदेश व अर्जातील संपुर्ण कागदपत्रे ही नियमीत फौजदारी खटला क्र.७४/२०२५, (शिरवळ पोलीस स्टेशन गु.र.नं.३९/२०२५) च्या कागदपत्रांत अथवा या गुन्ह्यात

दोषारोपपत्र दाखल झाल्यास त्या प्रकरणासोबत ठेवावे. सदर आदेशाबाबत तपासी अधिकारी यांना कळविण्यात यावे.

SHRUTI GIRISH KUVALEKAR
Digitally signed by SHRUTI GIRISH KUVALEKAR
Date: 2025.10.18 17:31:44 +0530

दिनांकः १८.१०.२०२५ (श्रीमती. एस. जी. कुवळेकर)
ठिकाणः खंडाळा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खंडाळा.